# महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल : शैक्षणिक क्षेत्रा संदर्भात

प्रा. मनोज के. सरोदे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
आर्ट्स कॉलेज, सिहोरा
manojsarode76@gmail.com

प्रस्तावना :

जगातील विभिन्न अर्थव्यवस्थांमध्ये संतुलित प्रादेशिक विकासाचे महत्व मान्य करण्यात आले आहे; परंतु जगातील बहुतेक सर्व विकसित व विकसनशील देशांत विविध विभागांचा किंवा प्रदेशांचा विकास एकसमान झालेला दिसत नाही. त्यांच्यात बरीच विषमता आढळते. सद्यस्थितीत जगातील बहुतेक सर्वच देशांत संतुलित प्रादेशिक विकासाची संकल्पना मान्य करण्यात आली आहे. भारतासारख्या मोठया देशात प्रादेशिक विकासात विषमता असणे स्वाभाविक आहे, कारण प्रत्येक प्रदेशाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, नैसर्गिक साधनसंपत्ती व वातावरण भिन्न आहे. तसेच आर्थिक विकासाकरिता असलेल्या संधीचा लाभ घेण्याकरिता लोकांची मनोवृत्ती सर्वत्र सारखी नाही. प्रादेशिक विकास ही एक अभूतपूर्व घटना आहे; परंतु विकसनशील देशात प्रादेशिक असमतोल या समस्येने गंभीर रूप धारण केले आहे.

भारतातील सर्वाधिक प्रगत राज्य म्हणजेच महाराष्ट्र राज्यात प्रादेशिक असमतोल टोकाचा आहे. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर या ठराविक भागांतच उद्योग—व्यवसाय—व्यापार यांची वाढ व प्रगती आणि जागतिकीकरणामुळे शिक्षण, तंत्रज्ञान, राहणीमान यांत झालेले बदल बघायला मिळतात. उर्वरित महाराष्ट्रापर्यंत नवीन उद्योग—व्यवसाय, रोजगार, शिक्षणाच्या, विकासाच्या संधी अजूनही पोचलेल्या नाहीत. ग्रामीण अविकसित क्षेत्राला आजही शिक्षण, तंत्रज्ञान, रोजगार आणि उद्योग— व्यवसाय— बाजारपेठा यांचा अभाव या समस्यांनी ग्रासले आहे. परिणामी राज्यातील लाखो लोकांच्या वाट्याला दारिद्र्य आले आहे. आधीच विकसित असलेल्या भागाचा आणखी विकास झाला. त्यामुळे गेल्या ५० वर्षात राज्यात विकासाचा प्रादेशिक असमतोल निर्माण झाला आहे. किंबहुना असे म्हटले जाते, राज्याच्या मूळ रचनेमध्येच विकासाच्या प्रक्रियेत असमतोल आहे. महाराष्ट्र राज्यातला असमतोल अभ्यासण्यासाठी अनुशेष आणि विकास खर्चाचे अध्ययन होणे आवश्यक आहे असे ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली ३१ मे २०११ रोजी उच्चस्तरीय समितीच्या अहवालावरून नक्षात येते.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत अध्ययनात महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलातील सत्यशोधन समितीचा अहवाल, केळकर समितीचा अहवाल, महाराष्ट्राचे राज्याचे वार्षिक अहवाल याद्वारे माहिती प्राप्त करण्यात आली आहे. प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक संशोधन आराखड्याची निवड करण्यात आली आहे. माहितीचे संकलन करून आलेख, विवेचन व पृथ:क्करण व संख्यात्मक विश्लेषण करण्यात आले आहे. शैक्षणिक संदर्भातील ओळख

विवेचन व पृथ:क्करण व संख्यात्मक विश्लेषण करण्यात आले आहे. वरील सर्व प्रक्रियेनंतर निष्कर्ष करते वस्तुनिष्ठ राहतील याची दरवळ घेण्यात गेली आहे. तसेच शैक्षणिक क्षेत्रामध्ये कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ यामध्ये झालेला खर्च कोटीमध्ये यावरून विश्लेषण करण्यात आले आहे.

संकलित माहितीचे विश्लेषण व निर्वाचन :

माध्यमिक शिक्षण व विद्यापीठ पूर्व शिक्षण कार्यक्रमांतर्गत झालेला खर्च

(रूपये कोटीत)

| अ.क्र. | विभाग | १९७९–८० (रू. कोटीत) | १९८९–९० (रू. कोटीत) | १९९९–२००० (रू. कोटीत) | २०००–१८ (रू. कोटीत) |
|---|---|---|---|---|---|
| १ | कोकण (बृहन्मुंबई वगळून) | ९७९.२२ | १२४५२.१२ | २६,४२५.२५ | ३६,१२५.४५ |
| २ | पश्चिम महाराष्ट्र | ४,१६९.९० | ९,१२६.८० | १४,१२६.३८ | २६,१२५.४५ |
| ३ | मराठवाडा | १,३६१.०१ | ८,४१६.३६ | १६,७४८.५१ | २९,१२५.७४ |
| ४ | विदर्भ | २,६५०.७८ | ७,१२९.८९ | १९,४५८.९२ | ३०,७४१.१५ |

स्त्रोत : महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलातील सत्यशोधन समितीचा अहवाल, मुंबई एप्रिल १९८४, पृष्ठ क्रं. ३३. व महाराष्ट्र शासनाचे आर्थिक सर्वेक्षण अहवाल (२००१ व २०१८), महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकी

प्रस्तुत सारणीमध्ये महाराष्ट्रातील विविध विभागात १९८०, १९९०, २००० व २०१८ या काळातील माध्यमिक शिक्षण व विद्यापीठ पूर्व शिक्षण कार्यक्रमांतर्गत योजनेवर झालेला खर्च दर्शविण्यात आला आहे.

- कोकण (बृहन्मुंबई वगळून): सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १९७९–८० मध्ये महाराष्ट्र शासनाद्वारे कोकण (बृहन्मुंबई वगळून) विभागात ९७९.२२ कोटी रू. माध्यमिक शिक्षण व विद्यापीठ पूर्व शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले तर १९८९–९० पर्यंत १२४५२.१२ कोटी रू. माध्यमिक शिक्षण व विद्यापीठ पूर्व शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले. त्याचप्रमाणे वर्ष १९९९–२००० व २०००–१८ मध्ये या विभागात अनुक्रमे २६४२५.२५ व ३६१२५.४५ कोटी रू. माध्यमिक शिक्षण व विद्यापीठ पूर्व शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले असल्याचे आढळले.
- पश्चिम महाराष्ट्र : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १९७९–८० मध्ये महाराष्ट्र शासनाद्वारे पश्चिम महाराष्ट्र विभागात ४,१६९.९० कोटी रूपये माध्यमिक शिक्षण व विद्यापीठ पूर्व शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले तर १९८९–९० पर्यंत ९,१२६.८० कोटी रूपये माध्यमिक शिक्षण व विद्यापीठ पूर्व शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले. त्याचप्रमाणे वर्ष १९९९–२००० व २०००–१८ मध्ये या विभागात अनुक्रमे १४,१२६.३८ व २६,१२५.४५ कोटी रूपये माध्यमिक शिक्षण व विद्यापीठ पूर्व शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले असल्याचे आढळले.
- मराठवाडा : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १९७९–८० मध्ये महाराष्ट्र शासनाद्वारे मराठवाडा विभागात १,३६१.

०१ कोटी रूपये माध्यमिक शिक्षण व विद्यापीठ पूर्व शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले तर १९८९—९० पर्यंत ८,४१६.३६ कोटी रूपये माध्यमिक शिक्षण व विद्यापीठ पूर्व शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले. त्याचप्रमाणे वर्ष १९९९—२००० व २०००—१८ मध्ये या विभागात अनुक्रमे १६,७४८.५१ व २९,१२५.७४ कोटी रूपये माध्यमिक शिक्षण व विद्यापीठ पूर्व शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले असल्याचे आढळले.

- विदर्भ : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १९७९—८० मध्ये महाराष्ट्र शासनाद्वारे विदर्भ विभागात २,६५०.७८ कोटी रूपये माध्यमिक शिक्षण व विद्यापीठ पूर्व शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले तर १९८९—९० पर्यंत ७,१२९.८९ कोटी रूपये माध्यमिक शिक्षण व विद्यापीठ पूर्व शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले. त्याचप्रमाणे वर्ष १९९९—२००० व २०००—१८ मध्ये या विभागात अनुक्रमे १९,४५८.९२ व ३०,७४१.१५ कोटी रूपये माध्यमिक शिक्षण व विद्यापीठ पूर्व शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले असल्याचे आढळले.

संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की वर्ष १९७९—८०, १९८९—९०, १९९९—२००० व २०००—१८ या काळातील महाराष्ट्रातील कोकण (बृहन्मुंबई वगळून), मराठवाडा व विदर्भ विभागांमध्ये माध्यमिक शिक्षण व विद्यापीठ पूर्व शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च जास्त प्रमाणात झाला असून या विभागांच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्रात माध्यमिक शिक्षण व विद्यापीठ पूर्व शिक्षण कार्यक्रमांवर झालेला खर्चाचे प्रमाण कमी आहे.

विद्यापीठीय व इतर शैक्षणिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत झालेला खर्च

(रूपये कोटीत)

| अ.क्र. | विभाग | १९७९—८० (रू. कोटीत) | १९८९—९० (रू. कोटीत) | १९९९—२००० (रू. कोटीत) | २०००—१८ (रू. कोटीत) |
|---|---|---|---|---|---|
| १ | कोकण (बृहन्मुंबई वगळून) | २४१.५८ | ९८२.३८ | १,९४२.२६ | ५,१५२.५२ |
| २ | पश्चिम महाराष्ट्र | १,७७७.५२ | २,९२१.४१ | ३,९११.३२ | ६,७१२.५३ |
| ३ | मराठवाडा | ४९१.०४ | १,१२६.४८ | २,९२३.८२ | ८,१२९.७६ |
| ४ | विदर्भ | ९४०.०३ | २,०२३.१२ | ३,१५२.५९ | ६,४८२.७८ |

स्त्रोत : महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलातील सत्यशोधन समितीचा अहवाल, मुंबई एप्रिल १९८४, पृष्ठ क्रं. ३३. व महाराष्ट्र शासनाचे आर्थिक सर्वेक्षण अहवाल(२००१ व २०१८), महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकी

प्रस्तुत सारणीमध्ये महाराष्ट्रातील विविध विभागात १९८०, १९९०, २००० व २०१८ या काळातील विद्यापीठीय व इतर शैक्षणिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत योजनेवर झालेला खर्च दर्शविण्यात आला आहे.

- कोकण (बृहन्मुंबई वगळून): सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १९७९–८० मध्ये महाराष्ट्र शासनाद्वारे कोकण (बृहन्मुंबई वगळून) विभागात २४१.५८ कोटी रू. विद्यापीठीय व इतर शैक्षणिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आला तर १९८९–९० पर्यंत ९८२.३८ कोटी रू. विद्यापीठीय व इतर शैक्षणिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आला. त्याचप्रमाणे वर्ष १९९९–२००० व २०००–१८ मध्ये या विभागात अनुक्रमे १,९४२.२६ व ५,१५२.५२ कोटी रू. विद्यापीठीय व इतर शैक्षणिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले असल्याचे आढळले.
- पश्चिम महाराष्ट्र : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १९७९–८० मध्ये महाराष्ट्र शासनाद्वारे पश्चिम महाराष्ट्र विभागात १,७७७.५२ कोटी रूपये विद्यापीठीय व इतर शैक्षणिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले तर १९८९–९० पर्यंत २,९२१.४१ कोटी रूपये विद्यापीठीय व इतर शैक्षणिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले. त्याचप्रमाणे वर्ष १९९९–२००० व २०००–१८ मध्ये या विभागात अनुक्रमे ३,९११.३२ व ६,७१२.५३ कोटी रूपये विद्यापीठीय व इतर शैक्षणिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले असल्याचे आढळले.
- मराठवाडा : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १९७९–८० मध्ये महाराष्ट्र शासनाद्वारे मराठवाडा विभागात ४९१.०४ कोटी रूपये विद्यापीठीय व इतर शैक्षणिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले तर १९८९–९० पर्यंत १,१२६.४८ कोटी रूपये विद्यापीठीय व इतर शैक्षणिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले. त्याचप्रमाणे वर्ष १९९९–२००० व २०००–१८ मध्ये या विभागात अनुक्रमे २,९२३.८२ व ८,१२९.७६ कोटी रूपये विद्यापीठीय व इतर शैक्षणिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले असल्याचे आढळले.
- विदर्भ : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १९७९–८० मध्ये महाराष्ट्र शासनाद्वारे विदर्भ विभागात ९४०.०३ कोटी रूपये विद्यापीठीय व इतर शैक्षणिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले तर १९८९–९० पर्यंत २,०२३.१२ कोटी रूपये विद्यापीठीय व इतर शैक्षणिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले. त्याचप्रमाणे वर्ष १९९९–२००० व २०००–१८ मध्ये या विभागात अनुक्रमे ३,१५२.५९ व ६,४८२.७८ कोटी रूपये विद्यापीठीय व इतर शैक्षणिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले असल्याचे आढळले.

संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की वर्ष १९७९–८० ते २०००–१८ या काळातील महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ विभागांमध्ये विद्यापीठीय व इतर शैक्षणिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च जास्त प्रमाणात झालेला असून या विभागांच्या तुलनेत कोकण (बृहन्मुंबई वगळून) भागातील विद्यापीठीय व इतर शैक्षणिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत झालेला खर्च खूप कमी आहे.

तांत्रिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत झालेला खर्च (रूपये कोटीत)

| अ.क्र. | विभाग | १९७९–८० (रू. कोटीत) | १९८९–९० (रू. कोटीत) | १९९९–२००० (रू. कोटीत) | २०००–१८ (रू. कोटीत) |
|---|---|---|---|---|---|
| १ | कोकण (बृहन्मुंबई वगळून) | १४.१४ | ५८.४२ | ८६.४२ | १०१.०५ |
| २ | पश्चिम महाराष्ट्र | १४४.६८ | १६५.७५ | १८५.४१ | २१५.२४ |
| ३ | मराठवाडा | ३७.४२ | ५७.४१ | ७६.८४ | ९८.२५ |
| ४ | विदर्भ | ७७.३६ | ९६.४५ | ११७.४८ | १४९.९३ |

स्त्रोत : महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलातील सत्यशोधन समितीचा अहवाल, मुंबई एप्रिल १९८४, पृष्ठ क्रं. ३३. व महाराष्ट्र शासनाचे आर्थिक सर्वेक्षण अहवाल (२००१ व २०१८), महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकी

प्रस्तुत सारणीमध्ये महाराष्ट्रातील विविध विभागात १९८०, १९९०, २००० व २०१८ या काळातील तांत्रिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत योजनेवर झालेला खर्च दर्शविण्यात आला आहे.

- कोकण (बृहन्मुंबई वगळून): सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १९७९–८० मध्ये महाराष्ट्र शासनाद्वारे कोकण (बृहन्मुंबई वगळून) विभागात १४.१४ कोटी रू. तांत्रिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले तर १९८९–९० पर्यंत ५८.४२ कोटी रू. तांत्रिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले. त्याचप्रमाणे वर्ष १९९९–२००० व २०००–१८ मध्ये या विभागात अनुक्रमे ८६.४२ व १०१.०५ कोटी रू. तांत्रिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले असल्याचे आढळले.
- पश्चिम महाराष्ट्र : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १९७९–८० मध्ये महाराष्ट्र शासनाद्वारे पश्चिम महाराष्ट्र विभागात १४४.६८ कोटी रूपये तांत्रिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले तर १९८९–९० पर्यंत १६५.७५ कोटी रूपये तांत्रिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले. त्याचप्रमाणे वर्ष १९९९–२००० व २०००–१८ मध्ये या विभागात अनुक्रमे १८५.४१ व २१५.२४ कोटी रूपये तांत्रिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले असल्याचे आढळले.
- मराठवाडा : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १९७९–८० मध्ये महाराष्ट्र शासनाद्वारे मराठवाडा विभागात ३७.४२ कोटी रूपये तांत्रिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले तर १९८९–९० पर्यंत ५७.४१ कोटी रूपये तांत्रिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले. त्याचप्रमाणे वर्ष १९९९–२००० व २०००–१८ मध्ये या विभागात अनुक्रमे ७६.८४ व ९८.२५ कोटी रूपये तांत्रिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले असल्याचे आढळले.
- विदर्भ : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १९७९–८० मध्ये महाराष्ट्र शासनाद्वारे विदर्भ विभागात ७७.३६ कोटी रूपये तांत्रिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले तर १९८९–९० पर्यंत ९६.४५ कोटी रूपये तांत्रिक शिक्षण

कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले. त्याचप्रमाणे वर्ष १९९९–२००० व २०००–१८ मध्ये या विभागात अनुक्रमे ११७.४८ व १४९.९३ कोटी रूपये तांत्रिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च करण्यात आले असल्याचे आढळले.

संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की वर्ष १९७९–८०, १९८९–९०, १९९९–२००० व २०००–१८ या काळातील महाराष्ट्रातील कोकण (बृहन्मुंबई वगळून) पश्चिम महाराष्ट्र व विदर्भ विभागांमध्ये तांत्रिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत खर्च जास्त प्रमाणात झाला असून या विभागांच्या तुलनेत मराठवाडा विभागातील तांत्रिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत झालेला खर्च कमी प्रमाणात होता.

शिक्षण सुविधा वरील खर्च :

- माध्यमिक शिक्षण : प्राप्त माहितीवरून असे निदर्शनास येते की, १९७९–८० या काळात महाराष्ट्र शासनाद्वारे माध्यमिक शिक्षण प्रदान करणारी योजनांतर्गत केल्या जाणा–या खर्चाचे चे प्रमाण पश्चिम महाराष्ट्र व कोकणात विदर्भ व मराठवाडा विभागाच्या तुलनेत जास्त होते, यामुळे प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच माध्यमिक शिक्षणाच्या देखील विकास झाला नाही.
- विद्यापीठ पूर्व, विद्यापीठीय व इतर शैक्षणिक कार्यक्रम : प्राप्त माहितीवरून असे निदर्शनास येते की, १९७९–८० या काळात महाराष्ट्र शासनाद्वारे विद्यापीठ पूर्व, विद्यापीठीय व इतर शैक्षणिक कार्यक्रमांतर्गत केल्या जाणा–या खर्चाचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रात जास्त होते व या विभागाच्या तुलनेत विदर्भ, कोकण व मराठवाडा विभागात अत्यंत कमी होते, ज्यामुळे येथील शिक्षणाच्या विकास झाला नाही.
- तांत्रिक शिक्षण : प्राप्त माहितीवरून असे निदर्शनास येते की, १९७९–८० या काळात महाराष्ट्र शासनाद्वारे तांत्रिक शिक्षणाकरिता केल्या जाणार्‍या खर्चाचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रात जास्त होते व या विभागाच्या तुलनेत विदर्भ, कोकण व मराठवाडा विभागात अत्यंत कमी होते, त्यामुळे येथील शिक्षणाचा अपेक्षेनुरूप विकास झाला नाही.

निष्कर्ष :

शैक्षणिक विकासासंर्दभात १९७९ – २०१८ या कालावधीतील शासकीय खर्चाचा तपशील असे दर्शवितो की कोकण व मराठवाडापेक्षा पश्चिम महाराष्ट्र व विदर्भ या विभागात प्राथमिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत, खर्च जास्त प्रमाणात झाला असून या विभागांच्या तुलनेत कोकण विभागातील प्राथमिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत, माध्यमिक शिक्षण व विद्यापीठ पूर्व शिक्षण कार्यक्रमांवर, विद्यापीठीय व इतर शैक्षणिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत व तांत्रिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत झालेला खर्च लक्षणीयरित्या कमी होता. कोणत्याही समाजाच्या उन्नतीकरिता शैक्षणिक विकास अत्यंत आवश्यक असा घटक आहे. शैक्षणिक क्षेत्रातील खर्च कमी असल्यामुळे मराठवाडा व कोकणात) मनुष्यबळ निर्मिती कमी प्रमाणात झाली, त्याच प्रमाणे जे मनुष्यबळ निर्माण झाले त्यांच्या करिता औद्योगिक क्षेत्रात संधी उपलब्ध नसल्याने त्यांना महाराष्ट्रातील तुलनेने प्रगत अश्या क्षेत्रात (पश्चिम महाराष्ट्र व मुंबई) स्थलांतरीत व्हावे लागले. ज्यामुळे विविध क्षेत्राच्या असमतोल असलेल्या

विकासाचा अनुभव या मनुष्यबळाला आला व या मुळे जनतेत प्रादेशिकता फोफावली असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आधारग्रंथ सूची :

1- खांदवे, ए., महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, आरती प्रकाशन, प्रथमावृत्ती २००९.
2- महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीचा अहवाल, महाराष्ट्र शासन नियोजन विभाग, मुंबई १९७४.
3- सहस्त्रबुद्धे, पु. ज., महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९७९.
4- काळे, भ., संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, संकेत प्रकाशन, जालना, प्रथमावृत्ती १९८८.
5- अकोलकर, प्र., जय महाराष्ट्र, प्रभात प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती १९९८.
6- करडेकर, अ. शे., महाराष्ट्राची वाटचाल, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००९.
7- केळकर, वि., महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील उच्चस्तरीय समितीचा अहवाल, आक्टोंबर २०१३.
8- घाटोळे, रा. ना., समाजशास्त्रीय संशोधन तत्वे आणि पद्धती, श्री मंगेश प्रकाशन, रामदास पेठ, नागपूर १०, चतुर्थ आवृत्ती १९९०.
9- बोधनकर, सु., सामाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर १०, दुसरी आवृत्ती १९९९.
10- भारत सरकार, तिसरी पंचवार्शिक योजना (१९६१–६२ ते १९६५–६६), भारत सरकार, नियोजन विभाग, दिल्ली, पृ. क्र. १५३.
11- Williamson J. G.; 'Regional Inequality and the process of National Development: A Description of the patterns;' in (Eds.) L. Needleman, Regional Analysis, Great Britain, 1968, pp.130-133.
12- Hemlata Rao; 'Regional Disparites and Development In India,' Ashish Publishing House, New Delhi, 1984.
13- Kuzents Simson;' Economic Growth and Structure', Oxford and IBH Publishing co., 1969.
14- Business Standard, "Kelkar to head Maharashtra panel on regional balance", Sanjay Jog, Febryary 23, 2011 - http://www.business-standard-com/india/news/kelkar-to-head-maharashtra-panelregional-balance/426206/
15- http://samatolvikas-org/attachments/article/45/gr_20110609124500001.pdf
16- http://samatolvikasorg/attachments/article/45/eÛtension_gr_20_july_2012.pdf